बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.NO./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३५३ ■ शुक्रवार २५ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

।। श्री गणेशाय नमः ।।
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.



१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

### पराभवाच्या पार्श्वभूमीची तयारी : भाजपचा पलटवार

# स्वायत्त असणाऱ्या निवडणूक आयोगाचा कारभार संशयास्पदच

# भाजपकडून मतचोरी, मुख्य आयुक्तांनी राजीनामा द्यावा : गांधी

**नवी दिल्ली, दि. २४ : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी नवी दिल्लीतील काँग्रेस मुख्यालय असलेल्या इंदिरा भवन येथे पत्रकार परिषद घेत निवडणूक आयोगाच्या कारभारावरून केंद्र सरकार आणि भारतीय जनता पक्षावर जोरदार निशाणा साधला. मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करत राहुल गांधी यांनी मत चोरीचा आरोप केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. दरम्यान, भाजपच्या प्रवक्त्यांनी काँग्रेस पक्ष आणि लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांच्यावर पलटवार केला. काँग्रेस आणि राहुल गांधीची भुमिका सोयीनुसार बदलते. भविष्यात होणाऱ्या पराभवाची चाहूल काँग्रेस नेत्यांना लागली आहे. त्या पराभवाची पार्श्वभूमी तयार करण्याचे काम राहुल गांधी करीत आहेत, असा दावा भाजपचे प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी, संबित पात्रां यांनी केला आहे.**



निवडणूक आयोगातील दोन निवडणूक आयुक्तांनी मागील दहा महिन्यांत विविध निर्णयांवर किमान चौदा वेळा अधिकृत आक्षेप नोंदवल्याच्या वृत्ताचा आधार राहुल गांधी यांनी आपल्या पत्रकार परिषदेत घेतला. सुखबीरसिंह संधू आणि विवेक जोशी यांनी मतदार यादी, नवीन मतदारांची नोंदणी, मतदारांची नावे समाविष्ट किंवा वगळण्याची प्रक्रिया तसेच मतदारांच्या माहितीच्या व्यवस्थापनाशी संबंधित मुद्द्यांवर आक्षेप घेतल्याचे वृत्त समोर आले आहे. निवडणूक आयोगातील दोन आयुक्तांनीच काही निर्णयांवर आक्षेप नोंदविल्याचा दावा करत राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केला. मतदार याद्यांच्या पुनरीक्षण प्रक्रियेमुळे लोकशाही व्यवस्थेवर परिणाम होत असल्याचा आरोप करत त्यांनी ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. दरम्यान, निवडणूक आयोगाने या आरोपांवर वेगळी भूमिका मांडली आहे. आयोगातील अंतर्गत चर्चा किंवा मतभेद हे प्रक्रियेचा भाग असू शकतात. मात्र, अंतिम निर्णय आयोगाने एकमताने घेतल्याचे आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**मत, कायदा, संस्था चोरी**

पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेवर तीव्र शब्दांत टीका **(पान ४ वर)**

## त्रिवेदी, संबित पात्रांचा काँग्रेसवर निशाणा



नवी दिल्ली दि.२४- लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत निवडणूक आयोग, मतदार याद्या आणि निवडणूक प्रक्रियेबाबत केलेल्या आरोपांवर भारतीय जनता पक्षाने जोरदार पलटवार केला. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी, खासदार संबित पात्रा यांच्यासह पक्षाच्या अन्य नेत्यांनी राहुल गांधींचे आरोप फेटाळून लावत काँग्रेसच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगातील कथित अंतर्गत मतभेदांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. त्यांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर तसेच विशेष सखोल मतदार यादी पुनरावलोकन प्रक्रियेवरही आक्षेप घेतला. भाजप प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी **(पान ४ वर)**

# आज कोरड्या दुष्काळ संदर्भात जी.आर. काढणार
# शेतकऱ्यांना थेट मदत मुख्यमंत्री- देवेंद्र फडणवीस

**वाशिम, दि. २४ : राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी उद्या (दि.२५) कोरड्या दुष्काळासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) काढण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच पीक विम्याची पूर्ण रक्कम शेतकऱ्यांना मिळवून देण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या राज्यातील दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करत आहेत. आज (२४ सप्टेंबर) दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी त्यांनी वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील म्हसला, मंगरूळपीर तालुक्यातील मोहगव्हाण आणि मालेगाव तालुक्यातील जऊळका या गावांना भेटी दिल्या. यावेळी**



**त्यांनी शेतांमध्ये जाऊन पिकांची सद्यस्थिती जाणून घेतली तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या.**

**आजच कोरड्या दुष्काळाचा जीआर**

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, उद्या (दि.२५) कोरड्या दुष्काळाचा जीआर काढण्यात येणार असून, त्याअंतर्गत सर्वांना पूर्णपणे मदत केली जाईल. यापुर्वी २०१६-२०१७ मध्ये कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफी देण्यात येणार आहे. पीक विम्याशी संबंधित प्रश्न सोडवून शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मिळवून देण्यासाठी सरकार प्रयतक करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत**

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदतीची आवश्यकता असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत देण्याबरोबरच पिण्याचे पाणी, चारा, मुलांचे शिक्षण आणि अन्नधान्य यांसारख्या गरजांमध्येही मदत केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारने सुरू केलेली कर्जमाफी पूर्ण केली जाईल, तसेच विजेचे बिल माफ करण्याचा **(पान ४ वर)**

### कॉक्रोच जनता पार्टीच्या पत्रकार परिषदेच चौफेर आरोप

# एसआयआर मधून तेरा कोटी मतदारांची नावे वगळली
# ज्ञानेशकुमारांनी अठ्ठेचाळीस तासात राजीनामा द्यावा : दिपके

**नवी दिल्ली, दि.२४ : विशेष सखोल मतदारयादी पुनरावलोकनाच्या (एसआयआर) मुद्द्यावरून कॉकरोच जनता पक्षाने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. पक्षाचे संस्थापक अभिजित दीपके यांनी ज्ञानेशकुमार यांनी ४८ तासांच्या आत राजीनामा द्यावा, अशी मागणी केली आहे. ज्ञानेशकुमार यांनी राजीनामा दिला नाही तर देशव्यापी**



**आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. एसआयआरच्या माध्यमातून देशातील १३ कोटींहून अधिक मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा दावा दीपके यांनी केला. या कारवाईमुळे नागरिकांच्या मतदानाच्या अधिकारावर परिणाम होत असल्याचा आरोप त्यांनी केला.**

अभिजित दीपके यांनी ज्ञानेशकुमार यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप केले. ज्ञानेशकुमार मुख्य निवडणूक आयुक्त झाल्यापासून कोण मतदान करणार आणि कोण मतदान करणार नाही, हे सरकार ठरवत असल्याचा दावा त्यांनी केला. लोकशाही म्हणजे जनतेने सरकार निवडणे. मात्र, मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर नावे वगळली जात असतील, तर ही लोकशाही कशी राहणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. देशातील लोकशाही व्यवस्था कमकुवत केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. तेरा कोटी नावे वगळण्याची गरज काय?

दीपके यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील मतांच्या फरकाचा संदर्भ देत एसआयआरमधून मोठ्या संख्येने नावे वगळल्याच्या दाव्यावर प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या मते, १३ कोटींहून अधिक मतदारांची नावे वगळणे हा अत्यंत मोठा आकडा आहे. या प्रक्रियेमागे राजकीय हेतू आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. मात्र, मतदार याद्यांमधून नेमक्या किती नोंदी कोणत्या कारणामुळे वगळण्यात आल्या, याबाबत अधिकृत आकडेवारी आणि कारणांची स्वतंत्र पडताळणी **(पान ४ वर)**

# धुळ्यात गणेश विसर्जन मिरवणुकीवर हायटेक पहारा
# अडीचहजारावर पोलिसांचा ताफा अन् ए.आय. ड्रोन

**धुळे, दि. २४ : गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत, निर्विघ्नपणे आणि उत्साहात पार पडावी, यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने यंदा कडेकोट बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. जिल्ह्यात तब्बल दोन हजार ५८९ पोलिस अधिकारी, कर्मचारी व होम गार्ड बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत. त्यासोबतच शहरातील गर्दीची ठिकाणे, संवेदनशील परिसर आणि महत्त्वाच्या मार्गांवर सीसीटीव्ही कॅमेरे तसेच दोन ए.आय. ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे**



**विशेष नजर ठेवली जाणार आहे. विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील मुख्य रस्ते, महत्त्वाचे चौक आणि विसर्जन स्थळांवर पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. बंदोबस्तामध्ये पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, तीन पोलीस उपअधीक्षक, चौदा पोलीस निरीक्षक आणि ८९ सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक यांचा समावेश आहे. याशिवाय एक हजार ६८९ पोलीस अंमलदार, ७०० पुरुष व शंभर महिला होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत.**

गणेश विसर्जन निर्विघ्नपणे आणि शांततेत पार पडावे, यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह राखीव पोलिस दलाच्या तीन तुकड्या, दोन शीघ्रकृती दलाची पथके आणि राज्य राखीव पोलिस दलाची एक कंपनी बंदोबस्तासाठी सज्ज ठेवण्यात आली आहे. गर्दीच्या ठिकाणी परिस्थितीवर तत्काळ नियंत्रण मिळविण्यासाठी शीघ्र कृती दलाची पथकेही तैनात राहणार आहेत.

**उपद्रवींवर कारवाई, तडीपारीचा बडगा**

गणेशोत्सव **(पान ४ वर)**

## युपीआय-एमडीआर आकारणी व्यापारी महासंघाची उद्या बैठक

धुळे, दि. २४ : केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार १५ ऑक्टोबर २०२६ पासून दोन हजारपेक्षा अधिक रकमेच्या युपीआय व्यवहारांवर एमडीआर लागू करण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर धुळे व्यापारी महासंघाच्या वतीने विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक शनिवार, २६ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ९ वाजता धुळे व्यापारी महासंघाच्या पारोळा रोड येथील कार्यालयात होणार आहे. या बैठकीत केंद्र शासनाच्या या निर्णयावर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.

पारदर्शक आर्थिक व्यवहारांना प्रोत्साहन मिळावे तसेच रोख रकमेची हाताळणी कमी व्हावी, या उद्देशाने युपीआय व्यवहारांना प्रोत्साहन देण्यात आले. मात्र, दोन हजारपेक्षा अधिक रकमेच्या युपीआय व्यवहारांवर एमडीआर लागू झाल्यास व्यापारी, ग्राहक, शेतकरी आणि विशेषतः गृहिणींवर त्याचा परिणाम होऊ शकतो, अशी भूमिका धुळे व्यापारी महासंघाने व्यक्त केली आहे. **(पान ४ वर)**

# मुख्य निवडणूक आयुक्तांवर राजद्रोहाचा
# खटला दाखल करा- शिवसेना उबाठाची मागणी

**धुळे दि.२४- भारताच्या मुख्य निवडणूक आयुक्तांच्या मनमानी व बेकायदेशीर कारभारामुळे जगामध्ये सर्वात मोठी लोकशाही असणाऱ्या भारत देशाच्या लोकशाहीची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. कालच्या इंडियन एक्सप्रेस मधील वृत्तामुळे देशात नव्हे तर जगात खळबळ उडाली आहे. ज्ञानेश कुमार या मुख्य निवडणूक आयुक्ताने एस.आय. आर प्रक्रियेच्या नावाखाली मतदारांची नावे वगळली. लाखो मतदारांना मतदानापासून वंचित ठेवले जे लोक भाजपाला मतदान करत नाही त्यांची नावे लाखोंच्या संख्येने कमी केली.**

इतर राज्यातील नावे निवडणूक नसलेल्या राज्यात टाकण्याचा भयंकर प्रकार देखील करण्यास कमी केले नाही. जे लाखो नावे कमी केली त्यांना मतदानापासून वंचित ठरवताना बांगलादेशी ठरवले गेले. त्यांची




पडताळणी आल्यानंतर ३१ टक्के लोकांची नावे पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली परंतु या लोकांना मतदान करता आले नाही. अशा मतदारांची संख्या १२% इतकी होती आणि भाजपाने या निवडणुका दोन-तीन टक्क्यांनी जिंकल्या, हा प्रकार सर्वत्र झाला, बिहारमध्ये तेच झाले ,महाराष्ट्रात देखील मतदान वाढवण्यात आले, सहा वाजेनंतर ७६ लाख मते वाढविण्यात आली ती एकूण मतदानाच्या ७% च्या जवळपास होतील ज्ञानेश कुमार यांनी त्यांच्या ऑफिसमध्ये अशी सिस्टीम विकसित **(पान ४ वर)**

## स्टेट बँक एटीएम मधून पैसे काढणे महागणार

मुंबई, दि. २४ : भारतीय स्टेट बँकेच्या काही खातेदारांसाठी एक ऑक्टोबर २०२६ पासून रोख रक्कम काढण्याच्या नियमांमध्ये बदल होणार आहे. नव्या नियमानुसार, खातेदारांना महिन्यातून ४ वेळा किंवा बँक शाखेतून रोख रक्कम काढणे मोफत राहणार आहे. मात्र, त्यानंतरच्या प्रत्येक अतिरिक्त रोख व्यवहारासाठी १५ रूपये शुल्क आणि त्यावर जीएसटी आकारला जाणार आहे. हा बदल एसबीआयच्या सर्व खातेदारांसाठी लागू होणार नसून, प्रामुख्याने बीएसबीडी खात्यांशी संबंधित ग्राहकांवर त्याचा परिणाम होणार आहे. त्यामुळे **(पान ४ वर)**

# स्मार्ट मीटर बसविण्यास विरोध
# कर्मचाऱ्याला धमकी, काम बंद

शिरपूर, दि. २४ (का.प्र.) : स्मार्ट टीओडी मीटर बसविण्याच्या कामात अडथळा निर्माण करून शासकीय कर्मचाऱ्याला शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी दिल्याच्या घटनेनंतर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या शिरपूर उपविभागीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन पुकारले आहे. याबाबतचे निवेदन पोलिस प्रशासनासह महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

तेवीस सप्टेंबर रोजी इदगाहनगर परिसरात जुने मीटर काढून नवीन स्मार्ट टीओडी मीटर बसविण्यासाठी महावितरणचे पथक गेले होते. त्यावेळी शेख वसीम शेख सलीम पटवे याने मीटर बदलण्यास विरोध करत कर्मचाऱ्यांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप आहे. तसेच कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार सहाय्यक अभियंता रविंद्र श्रावण दोरीक यांनी शिरपूर शहर पोलिस ठाण्यात दिली. या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम २२१, ३५२ आणि ३५१(२) अन्वये अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, दखलपात्र गुन्हा दाखल होईपर्यंत कामबंद आंदोलन सुरूच ठेवण्याची भूमिका महावितरणच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी **(पान ४ वर)**

## लोंढरेत अवैध वाळू उपसा कारवाईत तीन ट्रॅक्टर जप्त

शिरपूर, दि. २४ (का.प्र.) : तालुक्यातील लोंढरे येथील तापी नदीपात्रातून वाळू उपसा करून अवैधरित्या वाहतूक करणारे तीन ट्रॅक्टर शिरपूर महसूल विभागाच्या पथकाने २४ सप्टेंबर रोजी दुपारी जप्त केले. उपविभागीय अधिकारी डॉ. शरद मंडलिक आणि तहसीलदार महेंद्र माळी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

तापी नदीपात्रातून वाळू उपसा करून अवैध वाहतूक सुरू असल्याची माहिती महसूल विभागाला मिळाली होती. त्यानुसार पथकाने लोंढरे परिसरात छापा टाकून वाळू वाहतूक करणारे तीन ट्रॅक्टर जप्त केले. महेश साळुंके, मंडळ अधिकारी महेंद्र पाटील, मनीषा ठाकरे, पंकज महाले, ए.आर. राजपूत, दीपक पाटील, **(पान ४ वर)**

# सुझलॉन टॉवर दरोड्यातील तीन आरोपी जेरबंद
# तीनशे किलो तार, वाहन एलसीबीच्या ताब्यात

**नंदुरबार, दि. २४ (प्रतिनिधी) : नंदुरबार तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इंद्रीहट्टी शिवारातील सुझलॉन पवन ऊर्जा टॉवरवर दरोडा टाकून कॉपर केबल व इतर साहित्य चोरी करणाऱ्या टोळीतील तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. आरोपींकडून तीन लाख रुपये किमतीची तीनशे किलो तांब्याची काळ्या रंगाची तार आणि गुन्ह्यात वापरलेले चार लाख रुपये किमतीचे वाहन, असा एकूण सात लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

सात सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास इंद्रीहट्टी शिवारातील सुझलॉन टॉवर क्रमांक-३५५ येथे फिर्यादी व साक्षीदार उपस्थित होते. त्यावेळी काळे कपडे परिधान केलेले आणि चेहऱ्यावर काळे कापड बांधलेले अंदाजे १० ते १५ जण काठ्या, लोखंडी पाइप आणि कोयते घेऊन तेथे आले. त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर संशयितांनी फिर्यादी व साक्षीदारांचे मोबाईल जबरीने काढून घेत त्यांना सुमारे दोन तास बांधून ठेवले. त्यानंतर मशिनच्या साहाय्याने टॉवरचा दरवाजा कापून आत प्रवेश केला. टॉवरमधील कॉपर केबल आणि इतर साहित्य चोरी करून आरोपी पसार झाले. याप्रकरणी नंदुरबार तालुका पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४५७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१०(२) आणि ३११ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांनी तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला. आरोपींना जेरबंद करून चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना देण्यात आल्या. त्यानुसार हेमंत पाटील यांनी पथकाची स्थापना करून तपास सुरू केला. गुप्त बातमीदारांकडून मिळालेली माहिती तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे हा दरोडा धुळे जिल्ह्यातील जामदा आणि हट्टी येथील रहिवाशांनी इतर साथीदारांच्या मदतीने केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शोध घेऊन अनमोल अशोक भोसले (वय २६, रा. जामदा, ता. साक्री, जि. धुळे), मच्छिंद्र पुंडलिक मासुळे (वय २९, रा. हट्टी, **(पान २ वर)**




## १६ वे पुण्यस्मरण



**कै. सौ. रंजना सुभाष बाबर**

(स्वर्गवास दि. २६/९/२०१०)

अकस्मात नदी सागरा सोडूनी गेली
जिवनाची पहाट क्षणात भिन्न झाली
स्मृती सुमनांचा प्रवास सदैव दरवळावा
आदर्श मार्ग आपुला चिरंतन प्रेरणादायी रहावा

**शोकाकुल**

| | |
|---|---|
| सुभाष वसंत बाबर (पती) | विकास सुभाष बाबर |
| आकाश सुभाष बाबर | सौ.मोनिका आकाश बाबर |
| आशिष सुभाष बाबर | सौ.अर्चना आशिष बाबर |
| कु.आरुष आकाश बाबर (नातू) | तितीक्षा आशिष बाबर (नात) |

**समस्त बाबर परिवार, धुळे.**

## अंक बंद सूचना

अनंत चतुर्दशी अर्थात गणेश विसर्जनानिमित्त दै.आपला महाराष्ट्र कार्यालयाला आज सुटी आहे. त्यामुळे उद्या शनिवार दि.२६ सप्टेंबर २०२६ चा अंक प्रकाशित होणार नाही, याची नोंद घ्यावी.

– संपादक

**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,39,850 रु.+3% GST
सोने- 24 K -1,52,000 रु.+3% GST
चांदी- 2,38,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## सुरत वळण महामार्गावर तरुणाला मारहाण-लूट

धुळे, दि. २४ : हिरे मेडिकल कॉलेजसमोरील सुरत वळण महामार्गावर चितोड रोड परिसरातील एका तरुणाला अडवून दमदाटी व मारहाण करत त्याच्याकडील रोकड आणि वस्तू लुटल्याची घटना घडली. याप्रकरणी दोन अज्ञात जणांविरुद्ध धुळे शहर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दर्शन विलास जोगी (वय ३३, रा. प्लॉट नं. २६, सुदर्शन कॉलनी, चितोड रोड, धुळे) हे १९ सप्टेंबर रोजी रात्री १० ते पावणेअकराच्या दरम्यान हिरे मेडिकल **(पान ४ वर)**

# गरताडबारीत गर्भवतीला पेटविण्यास
# ज्वलनशील पदार्थाचा वापर; तपास जारी

**धुळे, दि.२४ (प्रतिनिधी) : धुळे -चाळीसगाव मार्गावरील गरताड (ता. धुळे) बारीत जळालेल्या अवस्थेतील ती मृत महिला गर्भवती असल्याचेही वैद्यकीय तपासणीत आढळले. तिच्यासह पोटातील गर्भाचाही पेटविल्याने मृत्यू झाला.मंगळवारी (२२ सप्टेंबर) दुपारी काटेरी झाडेझुडपांमध्ये जळालेल्या अवस्थेतील मृतदेह आढळला. तीन दिवसानंतरही अद्यापही तिची ओळख पटलेली नाही.**

मृत अनोळखी महिलेचे वय अठरा ते ३० वर्ष आहे, कपाळावर दोन्ही भुवयाच्या मध्ये तुळशी वृंदावन सारखे चिन्ह, हनुवटीवर गोंदलेले, सडपातळ बांधा आहे. हिरे वैद्यकीय महाविद्यालयात विच्छेदन करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्राथमिक अहवालानुसार घातपातातून पेटवून ठार केले. वनक्षेत्रात निर्जन स्थळी आणुन तिचे अंगावर पेट्रोल सदृश्य ज्वलनशील पदार्थ टाकुन तिस पेटवले, तिच्यासह तिचे पोटात असलेल्या गर्भास ठार मारले. याप्रकरणी हवालदार मुकेश मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अज्ञाताविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक शिल्पा पाटील तपास करीत आहेत.

# आपला महाराष्ट्र

## गणरायांना अखेरचा निरोप आणि विवेक

दहा दिवसांचा उत्सव आटोपून गणपती बाप्पा आज महाराष्ट्राचा निरोप घेत आहेत. गणपती उत्सव दरवर्षी येतो आणि दरवर्षी त्याचा समारोप होतो परंतु यावर्षी तो बऱ्याच अर्थाने गाजला. त्या वादविवादाचा केंद्रबिंदू पुण्यात होता आणि त्या बिंदूचे नाव होते बापट. सुरुवातीला बापट यांनी डीजे विरुद्ध आवाज उठवला आणि महाराष्ट्रभर तो दुमदुमला ठिकठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांनी लोकांच्या मागणीनुसार डीजेवर बंदी घातली. काही ठिकाणी प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. अधिकारी धर्मांध लोकप्रतिनिधीच्या दबावाखाली असले की लोकांच्या मागणीचा विचार करू शकत नाहीत. त्यांचा नाईलाज होतो. तसे काही जिल्ह्यात झाले आहे. मात्र बऱ्याच जिल्ह्यात डीजेवर प्रशासनाने बंदी घातल्यामुळे यावर्षीचा गणेशोत्सव काही अंशी तरी शांततेत पार पडला असे म्हणता येईल. लोकांनी जर ठरविले तर सार्वजनिक उत्सव शांततेने पार पडू शकतात हेही यावर्षी दिसून आले. उत्साही तरुणाई धार्मिक उत्सवात खूप गढून जातात. त्यांना प्रोत्साहन देणारे आणि पैसा पुरविणारे नेतेच असतात. कारण ते तरुण खुश राहिले म्हणजे त्यांचे राजकारण यशस्वी झाले असे मानले जाते. मोठ्या शहरातील तरुण देखील वर्गण्या गोळा करताना घुटण्याचा वापर करतात. आणि गोळा केलेले पैसे उडवतात. त्यांनाही डीजे हवा असतो. हा सगळा उन्मादाचा मुद्दा आहे. तो केंद्रस्थानी असल्यामुळे कोणीही ऐकण्याच्या मनस्थितीत नसतो. तळोदा तालुक्यातील छोट्या गावात उन्मादाचे प्रत्यंतर आले.गटातटाच्या भानगडीत तिथे एका तरूणाला प्राण गमवावे लागले. ज्यांना अशी स्थिती हवी आहे त्यांची मुले यात नसतात. परंतु सर्वसामान्य बहुजनांच्या मुलांना ही बाब कळत नाही. मुळात ते विवेकाचा वापरच करीत नाहीत. ज्या दिवशी त्यांना कळेल त्यादिवशी वेळ निघून गेलेली असेल. पण म्हणतात ना देर आये दुरुस्त आये. आपण त्या वेळेची वाट बघूया.

गणेशोत्सव लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनात लोकजागृतीसाठी सुरू केला. त्याचे परिणाम सुद्धा त्या काळात दिसले. त्यानिमित्ताने लोक एकत्र आले आणि टिळकांनी ठिकठिकाणी स्वातंत्र्याच्या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन लोकांना केले. अनेकांनी त्या आंदोलनात उडी घेतली. स्वातंत्र्य मिळाले. गणेशोत्सवाची परंपरा कायम राहिली परंतु त्याचे स्वरूप बदलत गेले आणि उत्सवाचे स्थान उन्मादात बदलले. काही गणेशोत्सव मंडळे जरूर विधायक उपक्रम राबवितात. त्या त्या मंडळाच्या परिसरात विविध खेळांचे, स्पर्धांचे, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. परंतु आता त्याचेही स्वरूप बदललेले आहे. त्यामुळे बहु आयामी सांस्कृतिक परंपरा आता दिसत नाही. पंतप्रधानांनी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणपतीच्या मूर्त्यां ऐवजी शाडू मातीच्या गणपतीच्या मुर्त्यांचा वापर करावा असे आवाहन केले होते. परंतु त्या आवाहनाला वाटाण्याच्या अक्षता सर्वच मंडळांनी लावल्या. उलट छोटे छोटे घरगुती गणपती शाडू मातीचे होते. त्यांचे विसर्जन देखील दीड दिवसानंतर, तीन दिवसानंतर, पाच आणि सात दिवसानंतर झाले, दहा दिवसांचे गणपती सगळे प्लास्टर ऑफ पॅरिसचे आहेत. ते कधीच पाण्यात विरघळत नाहीत. समुद्रात दरवर्षी ओहोटीच्या काळात सर्वत्र वाळूत गणपतीच्या मुर्त्या पडलेल्या दिसतात. ते चित्र फार विद्रुप दिसते. पण आपण काही विचार करायला तयार होत नाही. शेवटी विवेकाचा वापर करणारा समाज केव्हा निर्माण होईल हा प्रश्नच आहे.

ज्या पंतप्रधानांच्या वाढदिवसासाठी शेकडो हजारो दिवे लोक लावतात त्याच पंतप्रधानांच्या आवाहनाला तेच लोक प्रतिसाद देत नाहीत हे फार विचित्र आहे. म्हणूनच लोकांनी विवेक गमावला आहे असे म्हणणे भाग पडते. गणेशोत्सव सामाजिक आणि सांस्कृतिक आहे. त्याला धर्माची देखील झालर आहे. एक समूह उन्मादाच्या टोकाला जाऊन उत्साहाच्या नावाखाली लोकांचे जिणे दुष्कर करतो त्याची प्रतिक्रिया म्हणून दुसरा आणि तिसरा समाज समूह त्यांच्या त्यांच्या उत्सवांच्या काळात उन्मादाचा कळस गाठतो. असे हे जीव घेणे उत्सव झाले आहेत. गणेशाला निरोप देताना या वर्षाच्या अवर्षणाच्या परिस्थितीला देखील विसरण्याचा प्रयतक सर्वांनी केला. अन्नदाता शेतकरी मुख्यमंत्री जेव्हा शेताच्या बांधावर परिस्थिती बघण्यासाठी पोहोचले तेव्हा ढसाढसा रडत होता. १९७२ साली महाराष्ट्रात जबर दुष्काळ पडला होता. अमेरिकेतून अन्नधान्य आयात करून रेशनच्या माध्यमातून वाटप करावे लागले होते. यावर्षी तशी परिस्थिती उद्भवणार नाही असे दिसते. कारण देशांतर्गत भरपूर अन्नधान्याचा स्टॉक आहे. मुद्दा पिण्याच्या पाण्याचा आहे. बरीच धरणे भरली आणि बरीच रिकामी आहेत. जे जलाशय रिकामे आहेत. त्याच्या परिसरातील खेड्यापाड्यातील लोकांची पिण्याच्या पाण्याची गरज भरलेल्या जलाशयातून करणे शक्य आहे तशी व्यवस्था सरकारला करावी लागेल. केवळ पैशांची मदत देऊनही चालणार नाही.

शेतकऱ्यांना, शेतमजुरांना, त्यांच्यावर अवलंबून असलेल्या सर्व घटकांना सर्व प्रकारची मदत द्यावी लागेल. दुष्काळी परिस्थितीत सरकार रोजगार हमी वरची कामे काढत असते. त्यात खडी फोडणे, रस्ते खादणे वगैरे कामांचा समावेश असतो. त्या ऐवजी उत्पादक कामांचा समावेश केला पाहिजे. जेणेकरून भविष्यात जो काही पाऊस पडेल तो जमिनीत मुरला पाहिजे. त्यासाठी भूसंधारणाची कामे करणे, जमिनीची धूप थांबविण्यासाठी वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करणे, डोंगर पोखरून मुरूम दगड आदी खनिजे काढण्याचे काम बंद करणे. डोंगर वाचविणे असे निर्णय सरकारला घ्यावे लागतील. दुष्काळ हा नैसर्गिक आपत्तीचा भाग असला तरी त्यावर मात करणे माणसाच्या हातात आहे. वानरा प्रमाणे पाऊस आल्यानंतर घर शोधण्याचे काम करावे लागू नये म्हणून आधीच उपाययोजना करण्याची गरज असते. तसे सूक्ष्म नियोजन करणे गरजेचे आहे. पुढच्या वर्षी जेव्हा गणपती बाप्पा येतील तेव्हा त्या उत्सवात पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम राबविले गेले पाहिजेत. गणेशोत्सवाचा आगामी संदेश हाच असेल अशी खूणगाठ बांधूनच गणेशाला शेवटचा निरोप दिला पाहिजे.दुष्काळ हा नैसर्गिक आपत्तीचा भाग असला तरी त्याची तीव्रता कमी करणे माणसाच्या हातात आहे. पाऊस येण्यापूर्वीच पाण्याचे नियोजन, जलसंधारण, भूसंधारण आणि रोजगार यांचे सूक्ष्म नियोजन करणे आवश्यक आहे. पुढच्या वर्षी गणपती बाप्पा जेव्हा महाराष्ट्रात येतील, तेव्हा त्यांच्या स्वागताच्या उत्सवात पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबविले गेले पाहिजेत. ध्वनिप्रदूषणाला आळा, शाडू मातीच्या मूर्ती, कृत्रिम किंवा शास्त्रोक्त विसर्जन व्यवस्था, जलसंधारण, वृक्षसंवर्धन आणि सामाजिक प्रबोधन हा पुढील गणेशोत्सवाचा संदेश असला पाहिजे. गणेशोत्सवाने आपल्याला केवळ आनंद देऊ नये; त्याने विवेकही जागा केला पाहिजे. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या लोकजागृतीच्या मूळ हेतूशी पुन्हा नाते जोडण्याची हीच योग्य वेळ आहे. गणपतीला निरोप देताना याच संकल्पाची खूणगाठ बांधूया .उत्सव आनंदाचा असावा, उन्मादाचा नव्हे; तो लोकांना जोडणारा असावा, दुरावणारा नव्हे; आणि पर्यावरण वाचविणारा असावा, पर्यावरणाचा विनाश करणारा नव्हे.वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ।निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदाही प्रार्थना आपण करतो. ती फलदायी होवो आणि आपल्या समाजाला विवेक, संयम, सद्भावना व पर्यावरणसंवर्धनाची दिशा मिळो, हीच सदिच्छा.

## सुझलॉन टॉवर दरोड्यातील तीन आरोपी जेरबंद

**(पान १ वरून)** ता. साक्री, जि. धुळे) आणि शकील लतीफ खाटीक (वय ३९, व्यवसाय-ड्रायव्हर, रा. गरीब नवाज कॉलनी, दोंडाईचा, ता. दोंडाईचा, जि. धुळे) यांना ताब्यात घेतले.

चौकशी दरम्यान आरोपींनी इतर साथीदारांच्या मदतीने सुझलॉन टॉवरवर दरोडा टाकल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्याकडून ३ लाख रुपये किमतीची ३०० किलो तांब्याची तार तसेच गुन्ह्यात वापरलेले चार लाख रुपये किमतीचे वाहन असा एकूण सात लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, या गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध सुरू असून त्यांनाही लवकरच ताब्यात घेण्यात येईल. तसेच त्यांच्याकडून आणखी मुद्देमाल हस्तगत होण्याची शक्यता असल्याची माहिती पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांनी दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अश्विनी सानप आणि अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस उपनिरीक्षक मुकेश पवार तसेच पोलीस हवालदार ज्ञानेश्वर पाटील, मुकेश तावडे, सचिन वसावे, मोहन डमडेरे, दिनेश वसुले, योगेंद्र सोनार आणि पोलीस अंमलदार सचिन सैंदाणे, अभय राजपूत, विनोद पाटील, अनिल नागरगोजे यांच्या पथकाने केली.

## पुरुषोत्तम वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण संपन्न

शहादा, दि.२३ (का.प्र.)- स्वातंत्र्यसैनिक, सहकार व शिक्षणमहर्षि कै. अण्णासाहेब पी. के. पाटील यांच्या १२ व्या स्मृती दिनानिमित्त पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ व श्री. पी. के. अण्णा पाटील फाउंडेशन, शहादा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन विभागीय पुरुषोत्तम वक्तृत्व स्पर्धा नुकतीच पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या सर विश्वेश्वरैय्या सभागृहात उत्साहात पार पडली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण नंदुरबार जिल्हा परिषदेच्या माजी शिक्षण व आरोग्य सभापती सौ. जयश्रीबेन दीपक पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदुरबार या चार जिल्ह्यांतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व गुणांना वाव देण्यासाठी आयोजित या स्पर्धेत एकूण ३६ स्पर्धकांनी सहभाग नोंदवून विविध विषयांवर आपली मते मांडली.स्पर्धेचे पारितोषिक वितरण नंदुरबार जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य सभापती सौ.जयश्रीबेन दीपक पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. विजेत्यांना रोख रक्कम आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. विश्वासराव पाटील, कार्याध्यक्ष डॉ. सुनील पवार, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद पटेल यांच्यासह विविध शाखांचे प्राचार्य उपस्थित होते.या स्पर्धेत शिवानी रमेश मोर्या आर. सी. पटेल फार्मसी कॉलेज, शिरपूर हिने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय पारितोषिक फातिमा मोहम्मद रफीक इसानी पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ वरिष्ठ महाविद्यालय, शहादा आणि तृतीय पारितोषिक बेग नशराह मोहम्मद अली आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, शिरपूर यांना मिळाले. तसेच ऐश्वर्या प्रल्हाद पाटील एम.जे. कॉलेज, जळगाव व कल्पेश संजय माळी मराठा विद्या प्रसारक मंडळाचे विधी महाविद्यालय, नाशिक यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. स्पर्धेसाठी महाराष्ट्र माऊली साने गुरुजींची साहित्य साधना, युद्ध नको बुद्ध हवा, मन माझे सुंदर होवो, सोशल मीडिया: संवादाचे माध्यम की एकटेपणाची सुरुवात आणि प्रगतीच्या शर्यतीत आपण नेमके काय गमावले? हे विषय देण्यात आले होते. कार्यक्रमाच्या वेळी परीक्षक प्रा. डॉ. वा.ना. आंधळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजयप्रकाश शर्मा यांनी केले, तर निकाल वाचन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. चंद्रशेखर सुतार यांनी केले.

* नंदुरबार, दि. २४ सप्टेंबर २०२६ (जिमाका वृत्तसेवा) : दरवर्षी १ ऑक्टोबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून आज आदिवासी विकास विभागातून सेवानिवृत्त झालेल्या ६५ वर्षांवरील अधिकारी, कर्मचारी व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी डॉ. चंद्रकांत पवार यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिकांची सभा घेण्यात आली. यावेळी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत चर्चा करण्यात आली.

### प्रकाश में आज– बे–ईमान



मनोज कुमार राखी प्राण प्रेमनाथ नझीमा प्रेम चोपडा स्नेहलता राज मेहरा टुनटुन

## विद्यार्थ्यांनी स्वत:च्या सुरक्षिततेबाबत सजग राहणे गरजेचे- न्यायमुर्ती प्रवीण कुलकर्णी

**धुळे, दि.२३- विद्यार्थ्यांनी आपल्या हक्कांची जाणीव ठेवण्याबरोबरच स्वतःच्या सुरक्षिततेबाबत सजग राहणे गरजेचे आहे. आपल्यावर अन्याय होत असेल तर तो सहन न करता त्याला वाचा फोडा. विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी शासकीय यंत्रणा सदैव तत्पर असून, कायदेशीर मदतीसाठी १५१०० तसेच आपत्कालीन मदतीसाठी ११२ या क्रमांकांचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) न्यायमूर्ती प्रवीण कुलकर्णी यांनी केले.**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबई व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील सेंट अँथोनी स्कूल येथे इयत्ता आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना न्यायमूर्ती कुलकर्णी यांनी विविध कायदे, विद्यार्थ्यांचे अधिकार, बालसुरक्षा आणि आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

न्यायमूर्ती कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना गुड टच आणि बॅड टच यातील फरक समजावून सांगताना सांगितले की, वात्सल्यपूर्ण केलेला स्पर्श आणि वासनापूर्वक केलेला स्पर्श यातील फरक समजणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एखाद्या स्पर्शामुळे अस्वस्थता, भीती किंवा असुरक्षितता वाटत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. अशा प्रसंगी विश्वासातील व्यक्ती, पालक, शिक्षक किंवा संबंधित यंत्रणेला माहिती देणे आवश्यक आहे.

समाजात काही व्यक्तींकडून लहान मुलांचा गैरवापर किंवा लैंगिक छळ होण्याच्या घटना घडतात. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पॉक्सो कायदा, २०१२ अस्तित्वात आला असून, या कायद्यात बालकांच्या संरक्षणासाठी कठोर तरतुदी आहेत. विद्यार्थ्यांनी स्वतःवर किंवा इतर कोणत्याही बालकावर अन्याय होत असल्याचे लक्षात आल्यास तो प्रकार लपवू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

तुम्ही शाळेत येता, अभ्यास करता, भविष्यात डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक किंवा आपल्या आवडीच्या क्षेत्रात यश मिळविण्याचे स्वप्न पाहता. हे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर अन्यायाविरोधात आवाज उठविण्याचे धैर्यही ठेवले पाहिजे, असे न्यायमूर्ती कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

सध्याच्या काळात अमली पदार्थांचा वाढता गैरवापर ही चिंतेची बाब आहे. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या अमली पदार्थांच्या किंवा व्यसनाच्या आहारी जाऊ नये. समाजातील चांगल्या गोष्टी आत्मसात करून देशाला व्यसनमुक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी योगदान द्यावे, असेही न्यायमूर्ती कुलकर्णी यांनी सांगितले.

**सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींशी मैत्री धोकादायक**

फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सप यांसारख्या सोशल मीडिया माध्यमांचा वापर करताना विद्यार्थ्यांनी विशेष काळजी घ्यावी. सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तीशी मैत्री करून तिच्यावर विश्वास ठेवणे धोकादायक ठरू शकते. केवळ प्रेमाने दोन शब्द बोलणारी व्यक्ती चांगलीच असेल असे नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा अनावश्यक वापर टाळून अभ्यास, खेळ आणि शारीरिक व्यायामावर लक्ष केंद्रित करावे, असा सल्ला न्यायमूर्ती कुलकर्णी यांनी दिला.

यापूर्वी सहाय्यक लोक अभिरक्षक कार्यालयातील ॲड. भाग्यश्री वाघ यांनी नालसा (बालसस्नेही मुलांसाठी कायदेशीर सेवा) योजना, २०२४ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. न्यायव्यवस्था, पोलीस ठाणे किंवा इतर शासकीय यंत्रणांशी संपर्क येताना बालकांवर कोणताही दबाव येऊ नये आणि त्यांना मोकळेपणाने आपले म्हणणे मांडता यावे, यासाठी बालसस्नेही वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केली.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या माध्यमातून गरजू नागरिकांना कायदेशीर मदत उपलब्ध करून दिली जाते. तसेच लीगल एड डिफेन्स कौन्सिलच्या माध्यमातून पात्र व्यक्तींना कायदेशीर सहाय्य व मार्गदर्शन केले जाते, अशी माहिती देण्यात आली.



**अमली पदार्थांच्या गैरवापरावरही संवाद**

मुख्य लोक अभिरक्षक ॲड. डी. एस. महाजन यांनी विद्यार्थ्यांशी अमली पदार्थांचा गैरवापर या विषयावर संवाद साधला. अमली पदार्थांपासून दूर राहण्याचे तसेच स्वतःबरोबरच मित्र-मैत्रिणींनाही व्यसनांपासून दूर ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले.

कायदा हा केवळ शिक्षा देण्यासाठी नसून समाजातील नागरिकांचे संरक्षण करण्यासाठीही महत्त्वाचे साधन आहे. समाजात नवनवीन प्रकारचे गुन्हे निर्माण होत असताना त्यांना प्रतिबंध करण्यासाठी कायद्यात आवश्यक तरतुदी केल्या जातात, असेही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

**१५१०० व ११२ क्रमांकाची माहिती**

कायदेशीर मदतीसाठी १५१०० या क्रमांकावर संपर्क साधता येतो. हा विधी सहाय्याचा क्रमांक असून, गरजू व्यक्तींना कायदेशीर मदत मिळवून देण्यासाठी विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून आवश्यक कार्यवाही केली जाते. आपत्कालीन परिस्थितीत ११२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सेंट अँथोनी स्कूलचे जोसेफ श्रीगारे यांनी केले. कार्यक्रमास सहाय्यक लोक अभिरक्षक कार्यालयातील ॲड. भाग्यश्री वाघ, मुख्य लोक अभिरक्षक ॲड. डी. एस. महाजन, न्यायमूर्ती प्रवीण कुलकर्णी यांच्यासह शाळेतील शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आरपीआय आठवले गटाची बैठक संपन्न

धुळे, दि.२३- समता क्रांती मोर्चाच्या प्रचारार्थ आर.पी.आय. आठवले गटाच्या जिल्हा शाखेची बैठक जिल्हाध्यक्ष प्रभाकर जाधव यांच्या अध्यक्षतेखाली स्वस्तिक चित्रमंदिर येथे घेण्यात आली.

चवदार तळ्याच्या सत्याग्रहाला शंभर वर्ष पूर्ण झाले असून शताब्दी वर्षनिमित्त रिपब्लिकन इंडीया आठवले पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या निर्देशानुसार समता क्रांती मोर्चाला दि.१४ ऑक्टोबर २०२६ पासून सुरूवात होणार असून दि.२९ ऑक्टोबर रोजी धुळ्यात मुक्कामी आगमन होवून जाहिर सभा होणार आहे. बैठकीत वाल्मिक दामोदर, महेंद्र निळे, शशिकांत वाघ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी रामभाऊ माणिक, दीपक शिंदे, प्रेम अहिरे, संजय बैसाणे, भरत जाधव, नयना दामोदर, सरला निकम, कमलाकर मोहिते, प्रमोद शिरसाठ, संजय पाटोळे, कैलास आखाडे, देविदास वाघ, अशोक पानपाटील, अशोक नागमल, केदारेश्वर मोरे, रहीम पटेल, युसूफ पिंजारी, काशिनाथ साबरे, मनि खैरनार, योगेश पाटील, डॉ.भुषण पाटील आदि मान्यवर उपस्थित होते. प्रस्ताविक राजु शिरसाठ यांनी तर आभार आबा खंडारे यांनी मानले.

### शब्दकोडे क्रमांक : २४६१

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ■ | ३ | ४ | | ■ | ५ | | ६ |
| | ■ | | ■ | ७ | | | ■ | ८ | | ■ | |
| ९ | | ■ | १० | | ■ | ११ | | ■ | १२ | १३ | ■ |
| | ■ | १४ | | ■ | १५ | | ■ | १६ | ■ | १७ | |
| ■ | १८ | ■ | १९ | २० | | ■ | २१ | | २२ | | ■ |
| २३ | | | ■ | | ■ | २४ | ■ | २५ | | ■ | २६ |
| ■ | | ■ | २७ | ■ | २८ | | | ■ | २९ | ३० | |
| ३१ | ■ | ३२ | | ३३ | ■ | | ■ | ३४ | ■ | ३५ | |
| ३६ | | ■ | ३७ | | | ■ | ३८ | ■ | ३९ | | ■ |
| | ■ | ४० | ■ | | ■ | ४१ | | | ■ | ४२ | ४३ |
| ४४ | ४५ | | ४६ | ■ | ४७ | | | ■ | ४८ | | |
| ■ | | ■ | ४९ | | ■ | | ■ | ५० | | ■ | |

**आडवे शब्द :** १.भारतातील एक प्रमुख राज्य ३.एक मराठी महिना ५.कव्हर किंवा पॅकिंग ७.उपयोग ८.स्थिती ९.एक धातू १०.पहा ११.पैसे किंवा किंमत १२.भारताचा शेजारील देश १४.नरेश किंवा भूपती १५.मासा किंवा एक राशी १७.नंतर १९.मवाळ-विरुद्ध २१.लहान लढाई किंवा संघर्ष २३.एक तंतुवाद्य २५.युग-हिंदीत २८.मातीची भांडी घडवणारा २९.उर्दूत-आराम ३२.पाश्चिमात्य देश वा प्रदेश एक खंड ३४.गुजरातीत-दोन ही संख्या ३५.आळी ३६.घोडागाडी किंवा देवाचे वाहन ३७.पुन्हा किंवा माघारी ३९.जमीन किंवा ठिकाण ४१.रूप ४२.सेविका ४४.फरक किंवा अंतर ४७.वार करणे किंवा फटका ४८. इंग्रजीत आरसा ४९.नाश ५०.खूप आत

**उभे शब्द :** १.आशियातील एक देश २.दंगा ३,आशीर्वाद-विरुद्ध ४.देवाने प्रसन्न होऊन दिलेला आशीर्वाद ५.इलायची ६.फायदा ७.भारत -पाकिस्तान यांमधील एक सीमारेषा १०.भारतातील एक प्रसिद्ध वाहन उद्योग समूह १३.हिंदीत-मीठ १५.फॅक्टरी १६.मनमुटाव १८.तालात नसलेला २०.हत्ती-हिंदीत २२.मद्य २४.एखाद्यास धन्यवाद देणे २६.गाठोडे २७.संदेश ३०.दादा कोंडके ,अशोक सराफ यांचा एक सुपरहिट सिनेमा 'पांडू *****' ३१.आरंभ ३३.काळजी किंवा फिकीर ३८.काम धंदा नसलेला ४०.बनाव ४१.आपण सेवन करतो ते ४३.पातळ औषध ४५.नांगराचा लोखंडी भाग ४६.देह ४८.लमि-उलट लिहा

### शब्दकोडे क्रमांक : २४६० चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज | न | ता | ■ | जा | व | ई | ■ | का | र | भा | र |
| न | ट | ■ | ज | ■ | स | ■ | म | ■ | ग | ज | ■ |
| म | ■ | का | ग | द | ■ | श | ला | का | ■ | क | र |
| त | ला | ठी | ■ | ग | वा | र | ■ | रा | डा | ■ | ज |
| ■ | ल | ■ | क | ड | क | ■ | थ | वा | ■ | सा | त |
| सं | ■ | मा | या | ■ | डा | वा | ■ | स | वा | ल | ■ |
| ज | रा | ■ | स | वा | ■ | ह | द | ■ | प | सा | रा |
| य | व | स | ■ | स | पा | न | ■ | बा | र | ■ | त |
| द | स | ■ | तो | ■ | ल | ■ | भा | व | ■ | ना | रा |
| त्त | ■ | भा | क | री | ■ | सा | ■ | न | फा | ■ | णी |
| ■ | को | र | डा | ■ | त | ह | ल | का | ■ | व | ■ |
| प | रा | त | ■ | न | व | स | ■ | शी | त | ■ | रो |












## चौकशीची जाहीर नोटीस

जा.क्र. /एससी/१६५५/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
धुळे विभाग धुळे
पिंगळे कॉम्प्लेक्स, मोगलाई शाळा नं. १४ समोर, साक्री रोड, धुळे ४२४००१
दि. ३१/०८/२०२६

योजना अर्ज क्र. ५४७/२०२६
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्र. : **निळकंठेश्वर महादेव मंदिर आमोदे ता. शिरपूर जि.धुळे नो.क्र. ए. ००८२०/धुळे**

**१. श्री. शुभु महाराज** ... **अर्जदार**
**२. श्री. नानाभाऊ झुलाल गुरव** .. **अर्जदार.**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सहाय्यक धर्मदाय आयुक्त, धुळे विभाग, धुळे हे वर नमूद केलेल्या अर्जासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५०-अ(१) अन्वये **निळकंठेश्वर महादेव मंदिर आमोदे ता. शिरपूर जि.धुळे** या न्यासाला नवीन योजना लागू करणेबाबत खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१. उपरोक्त न्यासाच्या दिनांक २४/०५/२०२६ रोजीच्या सभेत न्यासाला नविन योजना लागू करण्याबाबत ठराव संमत केला आहे.अर्जदारांनी त्याबाबतचा योजनेचा मसुदासह योजना अर्ज दाखल केला आहे.
२) जंगम मिळकत (वर्णन) : न्यासाच्या परिशिष्ट १ प्रमाणे
३) स्थावर मिळकत (वर्णन) : न्यासाच्या परिशिष्ट १ प्रमाणे.

तरी सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आंत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल. व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त धुळे यांचे शिक्क्यानिशी आज दि. २५/०८/२०२६ रोजी दिली.

सही...
शिक्का
**अधिक्षक (न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
धुळे विभाग, धुळे

पान १ वरुन

## निवडणूक आयोगाचा कारभार संशयास्पदच

केली. मत चोरी, कायदा चोरी आणि संस्था चोरी अशा शब्दांत त्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर आरोप केले. निवडणुका आणि घटनात्मक संस्थांच्या विश्वासार्हतेवर यामुळे प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले. महाराष्ट्रासह विविध ठिकाणच्या मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर फेरबदल झाल्याचा आरोपही राहुल गांधी यांनी यावेळी केला. विशेष सखोल पुनरावलोकनाच्या प्रक्रियेत मतदारांची नावे वगळली जात असल्याचा दावा त्यांनी केला.

मोदी आणि शाह यांच्यावरही गंभीर आरोप

राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या जुन्या वक्तव्यांचा संदर्भ देत सरकारविरोधी लाटेचा मुद्दा उपस्थित केला. मोदी आणि शाह यांच्या काही जुन्या वक्तव्यांचे चलचित्र दाखवत त्यांनी निवडणुकांमध्ये सरकारविरोधी लाट ही लोकशाहीतील नैसर्गिक प्रक्रिया असल्याचे म्हटले. निवडणूक प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याचा आरोप करत राहुल गांधी यांनी भविष्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांची चौकशी होईल, असा दावा केला. तसेच निवडणूक प्रक्रियेत कथित गैरप्रकार करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी म्हटले.

आयोगातील कथित मतभेदामुळे राजकीय वाद

दरम्यान, २३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, निवडणूक आयुक्त सुखबीरसिंह संधू आणि विवेक जोशी यांनी १० महिन्यांच्या कालावधीत आयोगाच्या विविध निर्णयांवर १४ वेळा अधिकृत आक्षेप नोंदवले होते. या आक्षेपांमध्ये विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षणासह मतदारांची नावे समाविष्ट करणे, वगळणे आणि मतदारांच्या माहितीच्या व्यवस्थापनाशी संबंधित मुद्द्यांचा समावेश असल्याचे वृत्त आहे. मात्र, या कालावधीत निवडणूक आयोगाने अनेक प्रसंगी एकत्रित पत्रकार परिषदाही घेतल्या. त्यामुळे आयोगातील अंतर्गत मतभेद आणि अंतिम निर्णय प्रक्रियेबाबत राजकीय वाद निर्माण झाला आहे.

## त्रिवेदी, संबित पात्रांचा काँग्रेसवर निशाणा

राहुल गांधींच्या राजकीय भूमिकेवर टीका करत सरकारविरोधी लाटेबाबत केलेल्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित केले. जनतेच्या कल्याणासाठी आणि विकासासाठी सरकार काम करत असल्यास मतदार त्या कामाचे मूल्यमापन करतात, असा दावा त्यांनी केला. राहुल गांधींना सरकारविरोधी लाटेची संकल्पना समजलेली नाही, असा आरोपही भाजपकडून करण्यात आला.

**काँग्रेसच्या निवडणूक इतिहासाचा दाखला**

भाजपकडून काँग्रेसच्या पूर्वीच्या निवडणूक काळातील पद्धतींचा दाखला देत सध्याची निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक असल्याचा दावा करण्यात आला. केंद्रीय सुरक्षा यंत्रणा, बंदिस्त दूरचित्रवाणी यंत्रणा आणि विविध प्रशासकीय देखरेखीखाली निवडणुका घेतल्या जात असल्याचे भाजप नेत्यांनी सांगितले.

**घटनात्मक संस्थांवर आरोप कसे काय**

पराभव झाल्यानंतर काँग्रेस आणि तिचे मित्रपक्ष घटनात्मक संस्थांवर प्रश्न उपस्थित करतात, असा आरोप भाजप नेत्यांनी केला. निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थेच्या कामकाजाबाबत निवडणुकीपूर्वीच संशय निर्माण करणे योग्य नसल्याचे भाजपने म्हटले. खासदार संबित पात्रा यांनी काँग्रेसच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत, ज्या निवडणुकांमध्ये काँग्रेस किंवा विरोधी पक्षांना यश मिळते, त्या वेळी निवडणूक आयोगाच्या कामकाजावर अशाच प्रकारे प्रश्न उपस्थित केले जात नाहीत, असा दावा केला. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला मिळालेल्या ९९ जागांचा संदर्भ देत पात्रा यांनी प्रश्न उपस्थित केला की, मतदार याद्यांमध्ये किंवा निवडणूक प्रक्रियेत घोळ असल्याचा आरोप केला जात असेल, तर काँग्रेसला मिळालेल्या जागांबाबतही त्याच निकषाने प्रश्न उपस्थित व्हायला हवेत.

**आयोगाच्या भूमिकेचा भाजपकडून दाखला**

निवडणूक आयोगातील आयुक्तांमध्ये विविध मुद्द्यांवर चर्चा किंवा मतभेद होणे ही अंतर्गत प्रशासकीय प्रक्रियेचा भाग असल्याचे भाजपने म्हटले आहे. आयोगाच्या म्हणण्यानुसार, विशेष सखोल मतदार यादी पुनरावलोकनासह महत्त्वाचे निर्णय अखेरीस आयोगाच्या पातळीवर एकमताने घेण्यात आले. भाजपचे संबित पात्रा यांनी आयुक्तांमधील चर्चा ही लोकशाही प्रक्रियेचा भाग असल्याचे म्हटले होते. दरम्यान, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी विविध निर्णय व सूचनांबाबत गेल्या दहा महिन्यांत अनेक वेळा आक्षेप नोंदवल्याचा वृत्तांत समोर आल्यानंतर निवडणूक आयोगाच्या अंतर्गत प्रक्रियेवरून राजकीय वाद अधिक तीव्र झाला आहे.

**पराभवाच्या पार्श्वभूमीची तयारी : भाजप**

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसकडून निवडणूक प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित करून संभाव्य पराभवाची पार्श्वभूमी तयार केली जात असल्याचा आरोप भाजप नेत्यांनी केला. राहुल गांधींचे आरोप राजकीय हेतूने प्रेरित असून त्यात तथ्य नसल्याचे भाजपकडून सांगण्यात आले. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या कारभारावरून सत्ताधारी भाजप आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप तीव्र झाले असून, मतदार याद्यांच्या पुनरीक्षण प्रक्रियेवरून निर्माण झालेला हा वाद पुढील काळात आणखी चिघळण्याची शक्यता आहे.

## आज कोरड्या दुष्काळ संदर्भात जी.आर. काढणार

निर्णयही कायम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**कर्जवसुलीला पूर्णपणे स्थगिती**

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता बँकांना कर्जवसुली न करण्याच्या सूचना देण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. कर्जाच्या वसुलीला पूर्णपणे स्थगिती देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**रब्बी हंगामासाठीही मदत**

ज्या भागात पाण्याची उपलब्धता होईल, त्या ठिकाणी रब्बी हंगामातील पिकांसाठी शेतकऱ्यांना पूर्ण मदत केली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना मिळणारी रक्कम मिळवून देण्यासाठी सरकार कठोर भूमिका घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## एसआयआर मधून तेरा कोटी मतदारांची नावे वगळली

आवश्यक आहे.

**प्रादेशिक नेत्यांच्या पराभवाचा संदर्भ**

दीपके यांनी महाराष्ट्रातील उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस, तामिळनाडूतील एम. के. स्टॅलिन, केरळचे पिनराई विजयन, दिल्लीचे अरविंद केजरीवाल आणि पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी यांचा उल्लेख करत प्रादेशिक नेत्यांच्या निवडणूक कामगिरीशी मतदार यादीतील कथित बदलांचा संबंध असल्याचा आरोप केला. बंगाल, तामिळनाडू आणि दिल्लीतील काही मतदारसंघांमध्ये मोठ्या संख्येने नावे वगळण्यात आल्याचे दावे त्यांनी केले. मात्र, या दाव्यांची अधिकृत मतदार यादी, मतदारसंघनिहाय आकडेवारी आणि निवडणूक निकालांच्या आधारे स्वतंत्र पडताळणी होणे आवश्यक आहे.

**आमच्या मताला काही किंमत नाही का?**

पक्षाचे नेते सौरभ दास यांनीही मतदारांच्या मतदानाच्या अधिकाराचा मुद्दा उपस्थित केला. व्यवस्था बदलण्यासाठी नागरिकांकडे मतदान हे महत्त्वाचे साधन आहे; तेच अधिकारापासून वंचित राहिले तर बदल कसा घडणार, असा सवाल त्यांनी केला. गेल्या १० महिन्यांत निवडणूक आयोगातील दोन आयुक्तांनी १४ वेळा लेखी आक्षेप नोंदवल्याच्या वृत्ताचाही त्यांनी संदर्भ दिला. या आक्षेपांमध्ये निवडणूक प्रक्रियेशी संबंधित विविध मुद्दे उपस्थित करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. दरम्यान, निवडणूक आयोगाने यापूर्वी अंतर्गत चर्चेत वेगवेगळी मते मांडली जाणे ही प्रशासकीय प्रक्रियेचा भाग असल्याचे स्पष्ट केले आहे. आयोगाच्या म्हणण्यानुसार, अंतिम निर्णय एकमताने घेतले जातात. त्यामुळे एसआयआर, मतदार याद्यांतील बदल आणि आयोगाच्या अंतर्गत प्रक्रियेवरून सत्ताधारी पक्ष, विरोधक आणि विविध राजकीय संघटनांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. कॉकरोच जनता पक्षाने ४८ तासांचा अल्टिमेटम दिल्याने या मुद्द्यावर पुढील काळात आंदोलनाची दिशा काय असेल, याकडे लक्ष लागले आहे.

पान १ वरुन

## युपीआय-एमडीआर आकारणी व्यापारी महासंघाची उद्या बैठक

या निर्णयामुळे इच्छा नसतानाही नागरिकांना पुन्हा रोख व्यवहारांकडे वळावे लागू शकते, अशी चिंता महासंघाने व्यक्त केली आहे. त्यामुळे या विषयावर व्यापारी आणि नागरिकांच्या भूमिकेवर चर्चा करून पुढील दिशा ठरविण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस व्यापारी, ग्राहक संघटनांचे पदाधिकारी तसेच विविध व्यावसायिक संघटनांचे पदाधिकारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन धुळे व्यापारी महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मुख्य निवडणूक आयुक्तांवर राजद्रोहाचा

केली की नवीन मतदारांचे नाव त्यांच्या परवानगी शिवाय समाविष्ट होत नाही या निर्णयांना तीन आयुक्तांपैकी बहुमत आवश्यक असताना त्यांना वेळोवेळी सुखबीर सिंग संधु व विवेक जोशी या आयुक्तांनी अनेक निर्णयांना विरोध करूनही त्यांनी मनमानीपणे स्वतः च्या बेकायदेशीर निर्णयांची अंमलबजावणी करत राहिले , हा राजद्रोह असून त्यांनी घेतलेले सर्व निर्णय बेकायदा ठरतात, ज्ञानेश कुमार यांनी हरियाणा महाराष्ट्र पश्चिम बंगाल व बिहार निवडणुकांमध्ये भ्रष्टाचार व्होट चोरी केली. मतदान प्रक्रियेनंतर सहा ते सात टक्के मते भाजपाच्या पारड्यात टाकून भाजपाला निवडणुका जिंकून दिल्या म्हणून ज्ञानेश कुमार यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरावा त्यांना बडतर्फ करून अटक करावी वरील राज्यातील सरकारे बरखास्त करून त्या ठिकाणी पुन्हा निवडणुका घ्याव्यात अन्यथा हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने त्यांच्याविरुद्ध प्रचंड मोठे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देत आज शिवसेना पक्षाच्या वतीने धुळे जिल्हा अधिकारी कार्यालयावर निवडणूक आयोगाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना बडतर्फ करून तुरुंगात पाठवा अशी मागणी करण्यात आली याप्रसंगीयावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे नरेंद्र परदेशी धीरज पाटील, तेजस गोटे ,निंबा मराठे भरत मोरे अण्णा फुलपगारे डॉ .अनिल पाटील शिवाजी शिरसाळे महिला आघाडीच्या प्रभा परदेशी ,संगीता जोशी ,ज्योती चौधरी, दिलीप चित्ते, मुन्ना पठाण ,सुभाष मराठे, संजय पाटील,कपिल लिंगायत संदीप चौधरी मनोज बंब,अजय चौधरी,छोटू गवळी इशतियाक अंसारी, दीपक जाधव, निलेश कांजरेकर , गुलाब धोबी प्रकाश महानोर, अरुण पाटील , वैभव पाटील आदी उपस्थित होते. याप्रसंगी ज्ञानेश कुमार व निवडणूक आयोगाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

## स्टेट बँक एटीएम मधून पैसे काढणे महागणार

सामान्य बचत खाते असलेल्या प्रत्येक ग्राहकाला एक ऑक्टोबरपासून मधून पैसे काढण्यासाठी शुल्क लागणार, असा अर्थ काढणे चुकीचे ठरेल. नव्या नियमानुसार बीएसबीडी खातेदारांना महिन्यातून एकूण चार रोख व्यवहार विनाशुल्क करता येतील. यामध्ये एटीएम तसेच बँक शाखेतून केलेल्या रोख रक्कम काढण्याच्या व्यवहारांचा समावेश असेल.चार मोफत व्यवहारांची मर्यादा पूर्ण झाल्यानंतर केलेल्या प्रत्येक अतिरिक्त रोख व्यवहारासाठी १५ रूपये शुल्क आकारले जाईल. या शुल्कासोबत लागू असलेला जीएसटी वेगळा आकारला जाणार आहे.

आधार सक्षम पेमेंट प्रणाली द्वारे केलेल्या रोख व्यवहारांच्या नियमांमध्येही बदल करण्यात आला आहे. यापूर्वी द्वारे केलेले रोख व्यवहार डिजिटल व्यवहार म्हणून स्वतंत्र मानले जात असल्याने ते ४ मोफत रोख व्यवहारांच्या मर्यादेत धरले जात नव्हते. मात्र, एक ऑक्टोबरपासून एटीएम द्वारे काढलेली रोख रक्कमही या ४ मोफत रोख व्यवहारांच्या मर्यादेत मोजली जाणार आहे.

## लोंढरेत अवैध वाळू उपसा कारवाईत तीन ट्रॅक्टर जप्त

विजय बोरसे, जयेश साळुंखे, अर्जुन पवार, संदीप महाजन, शुभम रामटेके, रजनीकांत कांगुणे, रविना गिरासे, चेतना चौरे आणि रावसाहेब शिरसाट यांच्या पथकाने पोलिस बंदोबस्तात ही कारवाई केली. तालुक्यात यापुढेही अवैध वाळू उपसा अथवा वाहतूक आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महसूल विभागाच्या वतीने देण्यात आला आहे.

## सुरत वळण महामार्गावर तरुणाला मारहाण-लूट

कॉलेजसमोरील महामार्गावरून जात होते. त्यावेळी २ जणांनी त्यांना अडविले. दमदाटी करून त्यांच्या जवळील पाच हजार रोख रक्कम तसेच ब्लूटूथ आणि हेडफोन बळजबरीने हिसकावून घेतले. त्यानंतर संशयितांनी दर्शन जोगी यांना त्यांच्याच एटीएममधून पैसे काढण्यासाठी सर्व्हिस रोडने रेसिडेन्सी हॉटेलच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न केला. दर्शन जोगी यांनी आरडाओरड केली. त्यानंतर लुटमार करणारे दोघेही मोटारसायकल सोडून पसार झाले. या घटनेप्रकरणी दर्शन जोगी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार धुळे शहर पोलीस ठाण्यात दोन अज्ञात जणांविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.

सोफा, डायनींग टेबल, सोफा- कमबेड, पलंग, दिवान, टिपाई, कपाट, ड्रेसींग टेबल, आराम चेअर, ऑफीस टेबल ऑफीस चेअर तसेच वास्तु-शास्त्रा योग्य शेवन लाकडाचे मंदिर तसेच मार्बलचे मंदिर आणि तुळशी वृंदावन..



शिवम कॉर्पोरेशन
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

भाड्याने उपलब्ध

धुळे विमानतळ प्लाझा येथे भाड्याने जागा उपलब्ध गोंदूर विमानतळ रोड, धुळे येथे शो-रूम, ऑफिस व गोडाऊनसाठी प्रशस्त जागा भाड्याने उपलब्ध.
पाणी व वीज सुविधा उपलब्ध जागा वापरण्यास पूर्णतः तयार उपलब्ध जागा व मासिक भाडे :
* शो-रूम क्र.१-४३५ चौ.फुट रू.२५,०००/- प्रतिमाह
* शो-रूम क्र.२-६५१ चौ.फुट रू.३०,०००/- प्रतिमाह
* ऑफिस/गोडाऊन क्र.३-७७० चौ.फुट रू.२५,०००/- प्रतिमाह
* ऑफिस/गोडाऊन क्र.४-७३५ चौ.फुट रू.२५,०००/- प्रतिमाह
* ऑफिस/गोडाऊन क्र.५-१,०१५ चौ.फुट रू.३०,०००/- प्रतिमाह

व्यवसाय सुरू करण्यासाठी उत्तम लोकेशन
त्वरित ताबा उपलब्ध
-: संपर्क :-
श्री. गणेश: ९९२३४५८२१३
श्रीमती भगवती: ९८२००६०५२०

पान १ वरुन

## धुळ्यात गणेश विसर्जन मिरवणुकीवर हायटेक पहारा

काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी जिल्ह्यातील रेकॉर्डवरील अट्टल व उपद्रवी संशयितांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. काही संशयितांना गणेशोत्सव कालावधीसाठी जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले असून, त्यांच्याकडील शस्त्रे पोलिसांनी जप्त करून घेतली आहेत.

**वाहतुकीसाठी मार्गात बदल**

विसर्जन मिरवणुकीच्या मुख्य मार्गावर तसेच विसर्जन स्थळांवर वाहतूक सुरळीत राहण्यासाठी वाहतूक व्यवस्थेत आवश्यक बदल करण्यात आले आहेत. रुग्णवाहिका आणि अत्यावश्यक सेवांच्या वाहनांसाठी स्वतंत्र इमर्जन्सी लेन ठेवण्यात आली आहे. नदीपात्र आणि तलाव परिसरात जीवरक्षक, अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे विसर्जनादरम्यान कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तत्काळ मदत उपलब्ध होणार आहे.

विसर्जनापुर्वी पोलिसांचे पथसंचलन

दरम्यान, गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी पावणे ६ वाजेच्या सुमारास शहरातील साक्री रोडवरील भीमनगर येथून पोलीस दलाच्या वतीने पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले. हे पथसंचलन साखरे रोडमार्गे पुढे जुने जिल्हा रुग्णालय, कमलाबाई कन्या शाळेसमोरून श्रीरामतीर्थ धाममार्गे जुना आग्रारोडवरून पुढे महात्मा गांधी पुतळ्याजवळ पोहोचले. त्यानंतर ब्रिटिशकालीन पुलावरून पुढे जात देवपूर बसस्थानक येथे पथसंचलनाचा समारोप करण्यात आला.पोलीस प्रशासनाकडून गणेशभक्तांना डीजे आणि ध्वनीप्रदूषणासंदर्भातील नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच मद्यप्राशन करून उपद्रव करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. कोणतीही संशयास्पद व्यक्ती किंवा वस्तू आढळल्यास तत्काळ स्थानिक पोलिसांशी संपर्क साधावा आणि विसर्जन मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

## स्मार्ट मीटर बसविण्यास विरोध

घेतली आहे. दरम्यान, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महावितरणचे कर्मचारी मोठ्या संख्येने कामबंद आंदोलनात सहभागी झाल्यास वीजपुरवठा, देखभाल-दुरुस्तीची कामे तसेच गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यानची विद्युत व्यवस्था यावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## जिन्यावरून पडल्याने धुळ्यात बालकाचा मृत्यू

धुळे, दि. २४ : शासकीय दूध डेअरी परिसरातील १४ महिन्यांच्या बालकाचा जिन्यावरून पडल्याने झालेल्या दुखापतीत मृत्यू झाला. शिवांश प्रविण ढिवरे (वय १४ महिने, रा. दूध डेअरीमागे, पंचशील शाळेजवळ, दीप नगर, धुळे) असे मयत बालकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २२ सप्टेंबर रोजी रात्री पावणेदहाच्या सुमारास शिवांश अंगणात खेळत असताना पडला. जिन्यावरून पडल्याने त्याला गंभीर दुखापत झाली. त्याला उपचारासाठी धुळे शहरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले.

### उठावणा



**स्व.श्री.गोपाल तुलशीरामजी साखला**

बाबुलालजी साखला इनके भतीजे गोविंद (दादा) प्रकाश, श्रीकांत, श्याम, विष्णु इनके बडे भाई राजेश के चाचा तथा बन्टी के पिताजी स्व.श्री.गोपाल तुलशीरामजी साखला इनका ता. २३/०९/२०२६ को दु:खद निधन हो गया है.

जिनका उठावणा ता.२५/०९/२०२६ शुक्रवार को दोपहर ४ बजे तुळसी निवास खंडेराव बाजार आग्रारोड, यहाँ पर रखा है.

-: शोकाकुल :-
**समस्त साखला परिवार**

### १५ वे पुण्यस्मरण



**स्व.अरविंद दत्तात्रय सोनार (वाघ)**
(अनंत चतुर्दशी २०११)

अजूनही होतो भास तुम्ही आहात जवळपास
शांती लाभो तव आत्म्यास, हिच विनंती परमेश्वरास!
-------: शोकाकुल :-------
**वाघ परिवार, धुळे**

अकाउंटंट पाहिजे

फॅक्टरीसाठी अनुभवी अकाउंटंट आवश्यक. Tally, GST व अकाउंटिंगचे ज्ञान आवश्यक.
राहण्याची व जेवणाची सोय कंपनीकडून
दर २ ते २.५ महिन्यांनी ३-४ दिवसांची सुट्टी.
नोट: वर्षातील ५-६ महिने बाहेरगावी राहण्याची तयारी असणाऱ्यांनीच संपर्क साधावा. ४-५ महिने धुळे येथील ऑफिसला काम.
-: संपर्क :-
8554057113

प्लॉट विकणे

3900 sq.ft.
15 mtr DP road front २ रोड कॉर्नर प्लॉट विकणे. अरुण कुमार वैद्य नगर
-: संपर्क :-
7391055331

पाहिजेत

अनुभवी/नविन पेट्रोल पंपाच्या कामासाठी कर्मचारी पाहिजे.
चांगला पगार/वेतन देण्यात येईल.
-: संपर्क :-
सुपर सर्वो सेंटर
पांझरा पोळ समोर, पारोळा रोड, धुळे

WANTED

Full Trained Pharmacist & Experiance Must (3 Year)
Send Resume
9823833108

घर विकणे आहे

ग. नं. १, जुने धुळे येथील (मोठ्या पुलाजवळ) मारुती मंदिरा जवळील घर योग्य किंमत आल्यास विकणे आहे. त्वरित व्यवहारास प्राधान्य
-: संपर्क :-
9822494081

बागायत शेती पाहिजे

धुळे लगत १५ ते २० एकर पर्यंत बागायत शेती पाहिजे
-: संपर्क :-
8329593850

पाहिजेत

मशीन ऑपरेटर
बॅनर प्रिंटींग मशीनसाठी
लक्ष डिजीटल
सुभाष पुतळा मागे, औदुंबर मारुती मंदिर, ग.नं.७ धुळे
मो.87931 82796 / 9764832896

गाळा भाड्याने देणे

क्लिनिक/ऑफिससाठी 350 Sq. Ft. गाळा भाड्याने देणे आहे.
डॉक्टर हाऊस
पहिला मजला, संतोषी माता मंदिर चौक धुळे
-: संपर्क :-
9325833457
9923697467

पाहिजेत

अनुभवी सेल्समन पाहिजे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड & होजीअरी
गल्ली नं. २, अकबर चौक, धुळे
9422286958
पगार १० ते १२ हजार

पाहिजे

बुकिंग व ऑफिस कामासाठी महिला लावणे आहे.
-: संपर्क :-
श्री मारुती कुरियर
गल्ली नं. २, जे. बी. रोड, धुळे
9423185192

पाहिजेत

मेडिकलमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत.
-: संपर्क :-
9881118707

प्लॉट विकणे आहे

33X60 प्लॉट दत्त मंदिर चौक, माहेर हॉस्पिटल जवळ, देवपूर, धुळे
-: संपर्क :-
LG प्रॉपर्टीज
9793093955

पाहिजेत

कॉसमेटीक्स् मॉल मध्ये सेल्समन व सेल्सगर्ल पाहिजे
बीलींगसाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे.
-: संपर्क :-
कॉस्मेटीक्स् मॉल
9422287548

आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...

atomberg "Why not?"





क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे ३* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है !
SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE

59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक अँण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०